दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : १४०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, बुधवार, दि.०१ जानेवारी २०२५




## संतनगरीत भाविकांची मंदियाळी ! मंदिर रात्रभर खुले...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, शेगाव :** नववर्षानिमित्त प्रामुख्याने चिखलदरा, ताडोबा, महाबळेश्वर, लोणावळा सारख्या पर्यटन स्थळी जाऊन 'निसर्गाचा आनंद घेण्याकडे अनेकांचा कल असतो. मात्र संत गजानन महाराज यांच्या निस्सीम भक्तांसाठी शेगावातील संत गजानन महाराज हेच दैवत असल्याने तेथे दर्शनासाठी नवीन वर्षाची सुरुवात करण्यासाठी हजारो आबालवृद्ध भाविक शेगावात डेरेदाखल होतात. यंदाचे मावळते वर्षसुद्धा भाविकांच्या या अलिखित परंपरेला अपवाद ठरले नही.

मंगळवारी, ३१ डिसेंबर रोजी विदर्भ पंढरी शेगाव भाविकानी गजबजल्याचे चित्र आहे. आज पहाटेपासून बुलढाणा जिल्ह्यासह विदर्भ आणि राज्यातून हजारो भाविक मिळेल त्या वाहनानी शेगावात दाखल झाले. रात्री मुक्कामी असणाऱ्या भाविकानी मंगळवारी पहाटेच दर्शन घेतले. सकाळपासून दर्शनबारीमध्ये भविकांच्या रांगा वाढताच गेल्या. दुपारी बारा ते दोन वाजेच्या दरम्यान भाविकांच्या गर्दीने मंदिर परिसर नुसता फुलून गेला. विजय ग्रंथ पारायण सभागृह, महाप्रसादालय इथे भक्तांची गर्दी उसळली. प्रत्यक्ष दर्शनासाठी दोन तास तर मुख दर्शनासाठी विसेक मिनिटे लागत असल्याचे चित्र होते.

**चोख व्यवस्था...**

दरम्यान आज हजारोच्या संख्येने भाविका येणार या दृष्टीने संत गजानन महाराज संस्थांनातर्फे चोख व्यवस्था करण्यात आली होती. मंदिर परीसराची आकर्षक सजावट करण्यात आली. शेकडोच्या संख्येतील सेवेकरी ठिकठिकाणी तैनात करण्यात आले. संस्थान तर्फे करण्यात येणाऱ्या मोफत प्रसाद वितरणचा हजारो भाविकानी लाभ घेतला. आज, उद्या बुधवारी आणि परवा येणाऱ्या गुरुवारी भाविकांची गर्दी कायम राहण्याची चिन्हे आहेत.

**मंदिर रात्रभर खुले !**

दरम्यान राज्यभरातून येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये आणि दर्शन बारिवार होणारा ताण कमी करण्यासाठी आज एकतीस डिसेंबरला गजानन महाराज मंदिर रात्रभर खुले राहणार आहे. राज्यभरातून येणाऱ्या भक्तांच्या सोईसाठी संस्थानने हा निर्णय घेतला.

नविन वर्षाची सुरुवात श्रींच्या दर्शनाने करण्यासाठी शेगाव संतनगरीत नववर्षाच्या एक दिवसपूर्वी आणि पूर्वसंध्येलाच भाविक भक्तांची मोठी गर्दी झाली. यामुळे श्रींच्या दर्शनासाठी वेळ लागत आहे. त्यामुळे भक्तांना श्रींचे दर्शन लवकर व्हावे, दर्शनासाठी सुविधा व्हावी, म्हणून श्री संत गजानन महाराज संस्थानकडून आज मंदिर रात्रभर खुले ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरवर्षी नवीन वर्षानिमित्त देखील भाविकांची लाखोच्या संख्येने संतनगरीत गर्दी होत असते. राज्यासह देश विदेशातील भाविक देखील नवीन वर्षाची सुरुवात श्रींच्या दर्शनाने करतात. त्यामुळे नववर्षाच्या पूर्वसंध्यापासूनच संतनगरीत सतत दोन दिवस भाविकांची मोठ्या संख्येने गर्दी असते.

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० च्या प्रकल्पास गती द्यावी - मुख्यमंत्री फडणवीस



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, मुंबई :** मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी हा राज्य शासनाचा 'फ्लॅगशीप' कार्यक्रम आहे. या प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून विकासकांना काम करताना येत असणाऱ्या अडचणींचा जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी नियमित आढावा घेऊन येणाऱ्या समस्या सोडवाव्यात. यासंदर्भातील अहवाल पुढील १५ दिवसांमध्ये मुख्यमंत्री कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प राबवितांना प्रकल्प विकासकांना आता ग्रामपंचायतीकडून 'ना हरकत' प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नसल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, जमीन अतिक्रमीत झालेल्या ठिकाणी प्रकल्प विकासक तसेच जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रित बैठक घ्यावी. अतिक्रमित जमिनीसंदर्भातील विकासकांना येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी पोलीस अधीक्षक यांना जबाबदारी देण्यात यावी.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पाकरिता प्रकल्प विकासकांना लागणाऱ्या आवश्यक सर्व परवानग्या ऑनलाईन देण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, हा प्रकल्प राबवितांना काही अडचणी येत असतील आणि त्या जिल्हापातळी, गावपातळीवर सोडविणे शक्य नसेल तर त्या मंत्रालय स्तरावर सोडविल्या जातील. कोणत्याही परिस्थितीत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प वेळेत पूर्ण होऊन कार्यान्वित होईल, याकडे सर्वांनी जबाबदारीपूर्वक पाहण्याच्या सूचना मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिल्या.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० ची आढावा बैठक झाली. या बैठकीस ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, अतिरिक्त व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, प्रधान सचिव एकनाथ डवले,

वन विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, नाशिक जिल्हाधिकारी जलज शर्मा, मुख्य विद्युत निरिक्षक संदीप पाटील, ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी त्याचप्रमाणे दूरदृश्य प्रणालीद्वारे इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे तसेच पुणे, जालना, लातूर, अहिल्यानगर, नंदुरबार जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तसेच या प्रकल्पाचे विकासक उपस्थित होते.

## तब्बल ४५ वर्षाच्या संघर्षानंतर शेतकऱ्याला मिळाला ७/१२




**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.३१, मुदखेड (नांदेड) :** शासनाच्या एकत्रीकरण योजनेनंतर १९७९ च्या नंतर आज पर्यंत शासन स्तरावर केलेल्या संघर्षामुळे तब्बल ४५ वर्षानंतर तालुक्यातील एका तांड्यावरील शेतकऱ्यांस सातबारा उतारा मिळाला असल्यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त केल्या जात आहे

कनिराम गोमा पवार व सोमा धनजी पवार यांनी सन १९७९ ला मौ. डोणगांव येथील सर्वे क्र.७३ मधील१ हे २१ आर जमीन सन १९७९ मध्ये विठ्ठल मरिबा यांच्याकडून जमीन विकत घेतली होती. तदनंतर एकत्रिकरण योजनेमध्ये सदर सर्वे क्रमांकाचे गट क्र.१९६ गट क्रमांक झाला. परंतु कनिराम गोमा पवार व सोमा धनाजी पवार यांचा अंमल ७/१२ होणे गरजेचे होते. परंतु त्याठिकाणी तत्कालीन तलाठी यांनी दुस-याच व्यक्तीच्या नावाचा अंमल केला. सदर व्यक्तीची जमीन जुना सर्वे क्र. ६८ व गट क्र.१८४ मध्ये होती. सदर गट क्र.१८४ हा एकत्रिकरण योजनेनंतर झाला परंतु त्यांची ७/१२ तयार केली गेली नव्हती. अर्जदार हे ब-याच वर्षापासून तहसिल कार्यालय मुदखेड व उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, मुदखेड त्यांची ७/१२ मिळण्यास्तव चकरा मारत होते. सदर विषयी अर्जदार यांचा सहानुभूतिपुर्वक विचार करून नायब तहसिलदार महसूल मारोतराव जगताप यांनी सदर प्रकरणात जातीने लक्ष देवून सखोल चौकशी जुने अभिलेख तपासणी करून तसेच प्रत्यक्ष जायम ोक्यावर उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालयातील प्रतिनिधीसह भेट देवून म हाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १५५ खाली सदर प्रकरण चालवून दिनांक ०८/०२/२०२४ रोजी प्रकरणात निकाल देवून प्रत्यक्षात आज रोजी. आनंद देऊळगांकर, तहसिलदार, मुदखेड यांच्या हस्ते अर्जदारास तब्बल ४५ वर्षानंतर त्यांचा ७/१२ दिला. अर्जदार यांनी त्यांना तब्बल ४५ वर्षानंतर ७/१२ मिळाल्याबद्दल तहसिलदार व नायब तहसिलदार यांचे आभार व्यक्त केले. सदर कामी कार्यालयातील उल्हास जवळेकर, म.स.,शाम चौधरी, स.म.अ.गड्डमवारतलाठी, बोधमवाड तलाठी, गोपाल माने तलाठी, हयुम पठाण मंडळ अधिकारी विकास कदम, संगणक चालक यांनी मारोतराव जगताप नायब तहसिलदार यांना सदर कामी मदत करून अर्जदारास न्याय देण्यामध्ये मोलाचे काम पाहीले.

## सोने-चांदीच्या दरात घसरण

**दि.३१, नागपूर :** नववर्षाच्या स्वागताची तयारी सुरू असतानाच सरत्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी (३१ डिसेंबर २०२४ रोजी) सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली आहे. लग्न सराईच्या काळात दरात घसरण झाल्याने खरेदीदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

घराघरात नववर्षाच्या स्वागतासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. काही कुटुंबियांकडून शेती, फार्महाऊस, पर्यटन स्थळ अथवा हॉटेल्स वा इतरत्र नववर्षाचे स्वागताची जोरदार तयारी सुरू आहे. नववर्षात, लग्न, वाढदिवस वा इतर कार्यक्रमात काही नागरिक आपल्या जवळच्या नातेवाईकांना विविध दागिन्यांची भेट देत असतात. त्यामुळे हल्ली नागपूरसह सर्वत्र सराफा दुकानात ग्राहकांची गर्दी वाढली आहे. परंतु मागील काही दिवसांत सोन्याचे दर सातत्याने वाढल्याने ग्राहकांमध्ये चिंता होती.




## 'पुष्पक' च्या कामकाजामध्ये 'अक्षराज' चे योगदान



**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.३१, कांजूरमार्ग (मुंबई) :** मुंबई स्थित नामांकित 'पुष्पक' पतसंस्थेमध्ये अक्षराज दिनदर्शिका चे प्रकाशन वाटप करण्यात आले. याप्रसंगी सहकार क्षेत्रातील बँक व पतसंस्था मधील मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणपतराव आनंदराव पवार, उपाध्यक्ष अर्जुन जयसिंग भोसले, संचालक श्रीकांत कांबळे, विनायक पंडित तळेकर, संकेत किरण पवार, संतोष संपत पाटणे, मुख्य व्यवस्थापक किरण पवार, व्यवस्थापक उद्धव भोसले शासकीय लेखा परीक्षक ईश्वर चव्हाण, डीएमके बँकेचे अधिकारी भरत जगताप, सोनहीरा सहकारी पतसंस्था अध्यक्ष दत्तात्रय जगताप व सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## ठाणे येथे रिक्षाने घेतला पेट !



**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.३१, पाचपाखाडी (ठाणे) :** ठाण्यातील ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, नितीन कंपनी सर्विस रोडवर साधारणता बारा - साडेबाराच्या दरम्यान एका रिक्षाने पेट घेतला. रिक्षा आगीत जळून खाक झाली. आगीचे कारण समजू शकले नाही.

सदर घटना ही आज (दि.३१) रोजी दुपारी बारा-साडेबाराच्या दरम्यान घडली, रिक्षा चालक घाबरून पळून गेला. त्यानंतर आजूबाजूला असणाऱ्या रिक्षा चालकांनी अग्निशमन दलाला फोन केला व पोलिसांना याची माहिती दिली. अग्निशमन दलाची टीम घटनास्थळी पोहचली आणि आगीवर नियंत्रण मिळविले. सदर घटनेत कोणतीही जीवित हानी झालेली नाही.

## सोयाबीन खरेदी नोंदणीला ६ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**दि.३१, मुंबई :** सोयाबीन खरेदी नोंदणीची मुदत सात दिवसांनी म्हणजेच ६ जानेवारीपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी ३१ डिसेंबरपर्यंत ही मुदत होती. नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी नाफेड आणि 'एनसीसीएफ' यांच्यामार्फत १२ जानेवारीपर्यंत केली जाणार आहे. पणन विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर मंत्री जयकुमार रावल यांनी विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत मुदतवाढीचा निर्णय घेण्यात आला. किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत राज्यात सोयाबीनची खरेदी ४ हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल या हमीभावाने सुरू आहे. आतापर्यंत सोयाबीनची तीन लाख ३४ हजार ३३१ मेट्रिक टन एवढी विक्रमी खरेदी झाली आहे. मागील वर्षी केवळ ७ हजार ४०० क्विंटल एवढी खरेदी झाली होती. यावर्षी शेतकऱ्यांना एक हजार कोटी रुपये मोबदला देण्यात आला आहे. राज्यात सध्या ५६१ खरेदी केंद्र सुरू असून आतापर्यंत ६ लाख ६९ हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. शेतकऱ्यांना हमी भाव, तर ग्राहकांना रास्त दरात माल मिळाला पाहिजे यासाठी विभागाच्या माध्यमातून यापुढे प्रयत्न करण्यात येणार आहेत.

## संपादकीय



### बाल विवाह समस्येचे उच्चाटन व्हावे

बाल विवाहावर कायदेशीर बंदी असतानाही आज बाल विवाह कमी होताना दिसत नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात बाल विवाह झाल्याची एखादी तरी बातमी असतेच. महाराष्ट्रा सारख्या पुरोगामी आणि प्रगत राज्यातही बाल विवाहाचे प्रमाण लाक्षणिक आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला हे भूषणावह नाही. लॉक डाऊनमध्ये तर बालविवाहाचे प्रमाण खूप वाढले होते आता सर्व सुरळीत सुरू झाल्यानंतर तरी बाल विवाहाचे प्रमाण कमी होईल असे वाटले होते मात्र अजूनही राज्यात बाल विवाह होत आहेत. अर्थात इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रातील बाल विवाहाचे प्रमाण कमी आहे ही समाधानाची बाब असली तरी बाल विवाह पूर्णतः रोखण्यात महाराष्ट्र अपयशी ठरला आहे हे मान्यच करावे लागेल. मागील वर्षी द लांसेट ग्लोब हेल्थ या शोध पत्रिकेत एक अहवाल प्रकाशित झाला. या अहवालात आपल्या देशातील बाल विवाहाचा सद्य स्थितीवर बोट ठेवण्यात आले आहे. या अहवालानुसार देशातील काही राज्ये तसेच केंद्र शासित प्रदेशांमध्ये २०१६ ते २०२१ या कालावधीत बाल विवाहाची कुप्रथा सामान्य बनली असल्याचा दावा केला आहे. बाल विवाहामुळे देशाच्या प्रगतीला खीळ बसल्याचेही या अहवालात म्हंटले आहे याचाच अर्थ देशात आजही बालविवाह होत आहेत. राज्यातही होत आहेत. राज्याच्या विविध विभागातून मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील १६ आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये मागील चार वर्षामध्ये अल्पवयीन मातांची संख्या १२, २५३ इतकी आढळून आली आहे. या आदिवासी जिल्ह्यांत १८ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या गर्भवती मातांची संख्या देखील लाक्षणिक आहे. बाल विवाहाची प्रथा काही आदिवासी जमातींमध्ये पिढ्यानपिढ्या सुरू आहे. हा परंपरेचा भाग असला तरी पुणे मुंबई सारख्या शहरात आणि राज्याच्या ग्रामीण भागातही बाल विवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. आपल्या देशात मुला मुलींच्या लग्नाचे वय कायद्याने ठरवून दिले आहे. मुलांचे लग्नाचे वय २१ तर मुलींच्या लग्नाचे वय १८ असावे असे कायदा सांगतो त्यापेक्षा कमी वयात विवाह झाला तर तो बाल विवाह समजला जातो. २००६ साली केंद्र सरकारने बाल विवाह प्रतिबंधक कायदा नव्याने मंजूर केला. मात्र सरकारने मंजूर केलेल्या कायद्यानुसार बाल विवाहास कठोर शिक्षेची तरतूद आहे. मात्र या कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्याने या कायद्याचा धाक राहिला नाही. बाल विवाह झालेल्या मुला मुलीला लहानपणीच संसाराचा गाढा हाकलावा लागतो त्यामुळे त्यांचे बालपण हिरावले जाते. शिक्षण अर्धवट राहते. बाल विवाह झालेल्या मुलींना अल्पवयातच मातृत्व प्राप्त होते. त्यामुळे जन्माला येणारे बाळ देखील सशक्त नसते. बाल वयातच आई झालेल्या मुलीला देखील आरोग्याच्या समस्या निर्माण होतात त्यामुळे कुपोषणासह अनेक रोगांना त्यांना सामोरे जावे लागते. आज आपला देश सर्वच क्षेत्रात प्रगती करीत आहे. इंटरनेट, मोबाईल, आधुनिक तंत्रज्ञान यामुळे आपण जगासोबत स्पर्धा करीत आहोत. अगदी चंद्रावर देखील आपण स्वारी केली आहे. जगातील प्रगत देशात आपली गणना होऊ लागली आहे. आधुनिक शिक्षण घेऊन आपण काळासोबत पुढे जात असताना खेड्यापाड्यातील मुली बाल विवाहाला बळी पडत आहेत. ही विसंगती बदलायला हवी. त्यासाठी बाल विवाह समस्येचे मुळापासून उच्चाटन व्हायला हवे. बाल विवाह या सामाजिक समस्येचे उच्चाटन करायचे असेल तर सर्वांनाच जागृत करणे गरजेच आहे. भारतात बाल विवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन, प्रशासन, सामाजिक संस्था, व समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. बाल विवाह रोखण्यासाठी ग्राम पातळीवरील समित्या सक्षम करण्याची गरज आहे. लग्नासाठी वयाचे दाखले या समितीकडे जमा करून त्या समितीची लेखी परवानगी घ्यावी असा नियम केला तर बाल विवाहास काही प्रमाणात आळा बसेल. बाल विवाह होऊ नये यासाठी विविध स्तरातून जनजागृती करावी. ज्याप्रमाणे अस्पृश्यता, सतीची चाल, विधवा विवाहास बंदी, केशवपन या अनिष्ट चालीचे उच्चाटन झाले त्याप्रमाणे बाल विवाहाचे देखील उच्चाटन व्हायला हवे.

# मुंबईला प्रदूषणाचा विळखा !!



महाराष्ट्राची राजधानी असलेली मुंबई आता प्रदूषणाचीही राजधानी बनू लागली आहे. मुंबईतील प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली आहे. मागील काही दिवसात मुंबईतील हवेचा दर्जा अतिशय खराब नोंदवला गेला त्यामुळे दिल्ली पाठोपाठ आता मुंबईही सर्वाधिक प्रदूषित शहर बनले आहे. अर्थात ही काय भूषणावह बाब नाही उलट यामुळे महाराष्ट्राची मान खाली झुकली आहे अर्थात त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही मुंबईतील प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाय करा असा अनेक सामाजिक व सेवाभावी संघटनेने सरकारला इशारा दिला होता मात्र सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. केवळ मुंबईचं नाही तर मुंबईसह राज्यातील काही शहरांच्या हवेचा दर्जा देखील खराब श्रेणीत नोंदवला गेला आहे. गेल्या काही दिवसासून मुंबई शहरावर धुळीची चादर पसरली आहे. पश्चिम आशियातून येणाऱ्या धुळीच्या वादळाचा हा परिणाम असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. मात्र मुंबईतील प्रदूषणाचे केवळ हेच एकमेव कारण आहे असे नाही. मुंबईतील वाढत्या प्रदूषणाला इतर अनेक घटकही कारणीभूत आहेत. वाढत्या प्रदूषणामुळे मुंबई करांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे त्यामुळे मुंबई करांची चिंता वाढली आहे.

मागील वर्षी स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल प्रसिद्ध केला होता. या अहवालात जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांची यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश होता. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम – २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले होते.

आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची किती वाईट अवस्था झाली आहे हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर येते. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा लागला होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत आता देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे.

प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई – दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे.

वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम – विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. बांधकामांवर नियंत्रण आणायला हवे. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## यजमान सांगली, नंदुरबार, कोल्हापूर, पुणे ग्रामीण, मुंबई उपनगर (पश्चिम)उपांत्यपूर्व फेरीत

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, सांगली :** यजमान सांगलीसह नंदुरबार, कोल्हापूर, पुणे यांनी ५१व्या कुमार/कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या कुमार गटाची उपांत्यपूर्व फेरी गाठली. महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने सांगली जिल्हा कबड्डी असो.ने युवक मराठा मंडळाच्या सहकार्याने राज्य संघटनेचे उपाध्यक्ष माजी आमदार दिनकर तात्या पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त या स्पर्धेचे आयोजन केले आहे. सांगली,सांगलीवाडी येथील चिंचबाग मैदानावर सुरू असलेल्या उपउपांत्यपूर्व सामन्यात सांगलीने चुरशीच्या लढतील पुणे शहरचा प्रतिकार ३९–३७ असा मोडून काढत आगेकूच केली. पूर्वार्धात लोण देत २०–१० अशी आघाडी घेणाऱ्या सांगलीला उत्तरार्धात पुण्याने चांगलेच झुंजविले. उत्तरार्धात पुणेकरांनी आपला खेळ उंचावत खेळातील रंगत वाढविली. शेवटच्या मिनिटात लोण देत पुण्याने ३६–३७ अशी आघाडी कमी केली. पण सांगलीच्या आदित्य येसगुडे, ओम् शिंदे, हर्षद पाटील यांनी उत्कृष्ट खेळ करीत सामना आपल्या हातून निसटणार नाही याची काळजी घेत २गुणांनी विजय साकारला. निखिल तिवारी, प्रतीक पवार यांचा खेळ थोडा कमी पडला.

नंदुरबारने रत्नागिरीला ३२–२६ असे नमविले. सुरुवात आक्रमक करीत २लोण देत नंदुरबारने विश्रांतीला २३–१० अशी आघाडी घेतली. विश्रांतीनंतर रत्नागिरीला सुर सापडल्याने त्याने लोणची परतफेड करीत सामना रंगतदार अवस्थेत नेला. असीम शेख, रोशन चिपळूणकर यांच्या चतुरस्त्र खेळाने नंदुरबारने विजयाला गवसणी घातली. रत्नागिरीच्या अभिषेक शिंदे, अथर्व पाडावे यांचा खेळ रत्नागिरीला विजयी करण्यात व्यर्थ ठरला. कोल्हापूरने अहमदनगरचे आव्हान ३१–२० असे संपविले. मध्यांतराला लोण देत १७–०८ अशी आघाडी घेणाऱ्या कोल्हापूरने नंतर देखील खेळातील जोश कायम राखत आपला विजय सोपा केला. समर्थ देशमुख, सुहास मोहिते यांच्या चढाई पकडीच्या झंझावाती खेळाला या विजयाचे श्रेय जाते. अहमदनगरचा आशिष वाघ एकाकी लढला. पुणे ग्रामीणने बीडचा ३४–२६ असा पाडाव केला. अनुज गावडे, अर्जुन दडास यांच्या चतुरस्त्र खेळाने पूर्वार्धात १५–०९ अशी आघाडी घेणाऱ्या पुण्याने उत्तरार्धात सावध खेळ करीत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. बीडचा रोहित राठोड चमकला.

मुंबई उपनगरने (पश्चिम) चुरशीच्या लढतीत ठाणे ग्रामीणला चांगलेच झुंजविले. सामना समान गुणांवर संपला. त्यानंतर पाच पाच चढाईत मुंबई उपनगर (पश्चिम) ३ गुणांनी विजयी झाला. मुंबई उपनगरच्या ओम कुदळे. ईशांत शिंदे , प्रशांत पवार यांनी उत्कृष्ट खेळ करीत सामना जिंकला.उपांत्य फेरीच्या सामन्यात पुणे विरुध्द कोल्हापूर पाच–पाच चढाईत पुणे शहर १ गुणांनी विजयी झाले.

# नव्या वर्षासाठी घेऊया सामाजिक सुधारणांचा संकल्प !




सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नववर्षाचे स्वागत करताना आपल्यापैकी अनेक जण आत्मचिंतन करतात. सरत्या वर्षासाठी आपण कोणकोणते संकल्प केले होते, त्यापैकी किती पूर्ण झाले आणि किती शेष आहेत, केलेले संकल्प पूर्ण न होण्यामागे नक्की कोणकोणते अडथळे आले आणि त्यासोबतच येणाऱ्या वर्षात आपल्याला कोणकोणती शिखरे किती काळात गाठायची आहेत, येणाऱ्या अडचणींवर कशाप्रकारे मात करायची आहे याचे गणित मांडतात. हे संकल्प पूर्ण करण्यासाठी आपल्याला काय काय प्रयत्न करावे लागणार आहेत याची जंत्री बनवतात. प्रतिवर्षी केले जाणारे हे संकल्प बऱ्याचदा व्यावहारिक स्वरूपाचे असतात. विद्यार्थी एखादी परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्याचा संकल्प करतात, व्यावसायिक आपल्या व्यवसायात अधिकाधिक उत्पन्न मिळवण्याचा, व्यवसाय वाढवण्याचा संकल्प करतात, कार्यालयीन कर्मचारी कार्यालयात प्रमोशन आणि वेतनवृद्धी मिळवण्याच्या दृष्टीने संकल्प करून त्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची सूची बनवतात, नवीन गाडी, घर किंवा एखादी महागडी वस्तू विकत घेण्याचा संकल्प करतात, स्त्रीवर्ग येत्या वर्षात नवीन दागिना, वस्तू विकत घेण्याचा, पैसे बचतीचा संकल्प करतात. दरवर्षी केले जाणारे हे संकल्प पुढील काही दिवस आपल्या प्रयत्नांना ऊर्जा देण्याचे कार्य करत असतात.

जीवनात यश–अपयश येण्यामागे जसे आपले नशीब कारणीभूत असते तसे आपले गुण आणि दोषही कारणीभूत असतात. आपल्यापैकी किती जण वर्षाअखेरीस आपल्यात असलेल्या आणि वर्षभरात वाढलेल्या दोषांचे चिंतन करतात आणि हे दोष घालवण्यासाठी, आपल्यात नसलेले गुण आणण्यासाठी आणि अल्प प्रमाणात असलेल्या गुणांच्या वृद्धीसाठी प्रयत्न करतात ? आपल्यामध्ये अनेक दोष आहेत आणि ते वेळोवेळी उफाळून येतात. या दोषांमुळे आपले अनेकदा नुकसान होते, चुकीचे निर्णय घेतले जातात ज्यामुळे पश्चाताप करण्याची वेळ आपल्यावर येते हे प्रत्येकालाच ज्ञात असते; मात्र या दोषांची सूची बनवून येणाऱ्या वर्षात हे दोष कमी करण्यासाठी आणि सोबत आपल्यात नवनवीन गुण आणण्याच्या दृष्टीने आपण संकल्प करतो का ? यंदा असा संकल्पही करून पाहूया.दोषासोबत आपल्याला असलेला चुकीच्या सवयी, व्यसने यांची सूची बनवूया आणि त्यापैकी किती दोष आणि सवयी येणाऱ्या वर्षात कमी करायच्या, त्यासाठी कोणकोणते प्रयत्न करायला हवेत, कोणाकोणाचे साहाय्य घ्यायला हवे हेही लिहून काढूया आणि त्यासाठी टप्पाटप्प्याने प्रयत्न करूया.

वैयक्तिक स्तरावर संकल्प करताना काही सामाजिक स्तरावरील संकल्पही यावर्षी करूया. अनेक व्यक्तींचा मिळून समाज बनतो. आपण प्रत्येक जण समाजाचा एक अविभाज्य घटक आहोत. आपले शारिरिक आणि मानसिक आरोग्य हे सर्वस्वी समाजावर अवलंबून आहे. त्यामुळे तो निरोगी, सुदृढ आणि सशक्त असणेही तितकेच महत्वाचे आहे. आजमितीला या समाजाला अनेक दुष्प्रवृतींनी ग्रासले आहे, ज्याचा परिणाम समाजातील प्रत्येक घटकाला भोगावा लागत आहे. भ्रष्टाचार, गुंडगिरी, स्त्रियांवरील अत्याचार, लहान मुलांचे शोषण, जातीपातीतील तंटे, तरुणांमधील व्यसनाधीनता, प्रमुख शहरांना पडत चाललेला अमली पदार्थांचा विळखा,ऑनलाईन गेमिंग ऍप्सना बळी पडत चाललेली तरुणाई, टीव्ही आणि गेम्स आदींच्या नादात लहान मुलांचे हरवत चाललेले बालपण, फास्ट फूड–जंक फूड आदीच्या आहारी गेल्यामुळे वाढत चाललेली आजारपणे, भाज्या–फळे, धान्य, दूध आणि दुग्धजन्य उत्पादने यांमधील भेसळ, अन्नपदार्थांत वाढत चाललेला रसायनांचा वापर, बनावट औषधाचे वाढते स्तोम, घरभेदी सिरीयल्स, अश्लील–हिंसक वेबसिरीज आणि चित्रपट, मोबाईल मध्ये गुंतत चाललेले जीवन या सर्वांचा परिणाम म्हणून नातेवाईक आणि मित्र परिवार यांतील हरवत चाललेला सुसंवाद, पोलीस, डॉक्टर,वकील, शिक्षक ज्यांवर डोळे झाकून विश्वास ठेवला जात असे अशांमध्ये काही प्रमाणात पसरत चाललेली विश्वासघातकी वृत्ती यांसारख्या अनेक समस्या आज सामाजिक स्तरावर भेडसावत आहेत, ज्याचा परिणाम कुठेनाकुठे प्रत्येकाच्या जीवनावर पडत आहे. यासाठी राजकीय मंडळी किंवा सरकार काही करेल ही अपेक्षा करण्यापेक्षा या सर्वांच्या निर्मूलनासाठी मीं काय करू शकतो याचा विचार सरत्या वर्षाला निरोप देताना प्रत्येकाने करायला हवा.

समाजात पसरलेल्या या विविध रोगाना मीं किंवा माझे कुटुंबीय, माझा मित्रपरिवार यापैकी कुणी बळी पडला आहे का याचा शोध घेऊन त्यातून बाहेर पडण्यासाठी मीं काय करायला हवे याचे चिंतन करून त्या दिशेने प्रयत्न करायला हवेत. माझा समाज सुधारण्यासाठी आणि त्याचे स्वास्थ उत्तम राखण्यासाठी प्रयत्न करणे हें माझे सामाजिक कर्तव्य आहे याची जाणीव ठेवून त्यासाठी मीं काय करू शकतो यादृष्टीने येत्या वर्षाकरिता संकल्प करून पाहूया. महाराष्ट्र भूमी ही छत्रपती शिवरायांची भूमी आहे ज्यांनी तुन्टपुंज्या मावळ्यांच्या बळावर पाच पाटशाह्यांना लोळवले. अत्याचारी यवनांचे सामाज्य उध्वस्त करून हिंदवी स्वराज्य स्थापन केले. ही भूमी देशभक्त क्रांतिकारकांची आहे ज्यांनी भारतमातेला परतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेवले, प्रसंगी प्राणाचे बलिदान दिले. ही भूमी समाजसुधारकांची आहे ज्यांनी सामाजिक दुष्प्रवृत्तीच्या विरोधात लढण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. या सर्वांचा आदर्श घेऊन नवीन वर्षात वैयक्तिक प्रगतीचे संकल्प करताना सामाजिक सुधारणेचाही संकल्प करूया. आज ना उद्या समाजातील पालट आपल्याला नक्कीच जाणवेल.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# नवीन वर्षाच्या स्वागतासाठी उपप्रादेशिक परिवहन कल्याण तर्फे जनजागृती




**विश्वनाथ शेनोय**

**दि.३१, कल्याण (ठाणे) :** गेल्या ४-५ दिवसापासून नवीन वर्षाचा स्वागतासाठी पोलीस विभाग सतर्कता बाळगत असून नशेखोर यांच्यावर कठोर कारवाईचे पाऊल उचलले आहे त्या अनुषंगाने उपप्रादेशिक परिवहन कल्याण अधिकारी आशुतोष बारकुल यांचा म ार्गदर्शनाखाली कल्याण डोंबिवली हद्दीत रेस्टॉरंट बार वर दारू पिऊन गाडी चालवू नये व कायदेशीर गुन्हा असल्याची पोस्टर लावून जनजागृती केली. या जनजागृतीमध्ये उपप्रादेशिक परिवहन कल्याणचे मोटर वाहन निरीक्षक रोहित पवार, विजय नरवडे, निलेश अहिरे, प्रियंका सागावकर आणि वाहन चालक यशवंतराव, चौरे, जगताप यांनी संध्याकाळी ठिकठिकाणी नाकाबंदी दरम्यान ड्रिंक अँड ड्राईव्ह चे कारवाई केली. दिनांक ३१ डिसेंबर २०२४ नवीन वर्ष साजरा करताना लोकांनी दारू पिऊन गाडी चालू नये. तसेच वाहतुकीचे सर्व नियम पाळावे असे आव्हान उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अशितोष बारकुल यांनी केली आहे व नवीन वर्षाचे शुभेच्छा त्यांनी दिल्या.


# शिरवळ क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.३१, खंडाळा (सातारा) :** नुकतेच शिरवळ जिमखाना यांचे वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाची सुरूवात सायकल रॅलीने झाली. या रॅलीचा शुभारंभ शिरवळचे लोकनियुक्त सरपंच रविराज दुधगावकर यांचे हस्ते करण्यात आला. या रॅली नंतर ॲथलेटिक्स स्पर्धा झाल्या या स्पर्धेचे उद्घाटन अविनाश मेढेकर तर पारितोषिक वितरण शिरीष पवार यांचे हस्ते करण्यात आले. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी बॅडमिंटन व टेबल टेनिस या खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचे उद्घाटन जिमखाना अध्यक्ष डॉ.विजय शिंदे यांनी केले तर पारितोषिक वितरण सातारा जि.प.माजी अध्यक्ष उदय कबुले, खंडाळा शेतकरी सहकारी साखर कारखाना उपाध्यक्ष राजेंद्र तांबे उपसरपंच ताहेर काझी सदस्य राहुल तांबे, तृप्ती देशमुख,रूपाली ताई गिरी, तृप्ती देशमुख व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या ॲथलेटिक्स स्पर्धेत एम.ई.एस इंग्लिश मेडिकल स्कूल ने प्रथम तर ज्ञानसंवर्धनी विद्यालय ने द्वितीय क्रमांक तर ज्ञानसंवर्धनी इंग्लिश मेडीअमने तृतीय क्रमांक पदतालिकेत मिळविला. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सचिव प्रा.डॉ.गणेश भुतकर,सदस्य प्रताप भानुशाली, राजकुमार शहा, संदेश यादव, रमेश चव्हाण, डॉ.राजेंद्र देशमुख, हर्ष जोशी किरण पवार, नितीन कोंडे,अमोल जरांडे, प्रशांत कबुले, अजय चौगुले, अमोल घाडगे, गणेश कंक, कुणाल गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अंबरनाथ नगरपरिषदेकडून भिंतीचित्राच्या माध्यमातून जनजागृती



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.३१, ठाणे :** अंबरनाथ महाराष्ट्र शासनाच्या विविध अभियानातंर्गत कायम अव्वलस्थानी असणार्या अंबरनाथ नगरपालिकेकडून शहरात पर्यावरण विषयक भितींचित्राच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील अनेक नगर परिषदेना आपल्या कुंचल्यातून साकारलेल्या चित्र व संदेशातून राज्य व राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार प्राप्त करणार्या चित्रकार मोहन जगताप यांच्या हस्तकलेतून अंबरनाथ नगर पालिकेच्या रेखाटलेल्या भिंती शहरात येणार्या पर्यटकांचे व नागरिकांचे खास आकर्षण ठरत आहे. शासनाच्या शहर स्वच्छता अभियान, माझी वसुंधरा, एनकॅप अभियानाचा एक भाग म्हणून अंबरनाथ नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरातील विविध भिंतीवर पर्यावरण विषयक शाळा तसेच नगरपालिकेच्या भिंती, शहराच्या मोक्यावरील ठिकाणी ही भित्तीचित्रे रेखाटली आहेत. या चित्रातून शालेय विद्यार्थ्यांना, पालकांना तसेच नागरिकांनीही आनंद मिळतो आहे. या चित्रांच्या माध्यमातून स्वच्छता, निसर्ग संवर्धन , पाणी व पशुपक्षी वाचवा या पर्यावरणाविषयी लोकांच्या मनात जनजागृती होत आहे.

अंबरनाथ नगर पालिकेच्या माध्यमातून प्रशासकीय अधिकारी डॉ.प्रशांत रसाळ व मुख्याधिकारी अभिषेक पराडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागाच्या विभागप्रमुख अधिकारी व कर्मचारी यांच्या कल्पकतेने सूचित केलेल्या चित्रांची योग्य मांडणी करून भिंतीचित्र माध्यमातुन स्वच्छता व प्लास्टिक बंदी, आरोग्य, पर्यावरण, पशुधन, पक्षी तसेच संस्कृती दर्शन कुंचल्यातून घडविले आहे त्यामुळे अक्षरशः भिंती बोलक्या बनल्या आहेत. महाराष्ट्रातील महाड, सासवड, महाबळेश्वर, कोल्हापूर जेजुरी याशिवाय अन्य नगर पालिकेच्या माध्यामातून प्रसिद्ध चित्रकार मोहन जगताप यांनी आपल्या हस्तकलेच्या माध्यमातुन पेंटिंग केलेल्या बोलक्या भिंती चित्रामुळे राज्य व राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार मिळाले आहेत. तसेच भारत सरकारच्या माध्यामातून सुरू असलेल्या नवभारत साक्षरता अभियानातील नवसाक्षर हितासाठी साकारलेले ७८ वर्षीय नवसाक्षर आज्जीच्या छायाचित्र पेंटिग्ज भारत सरकारच्या दिल्लीतील मंत्रालय येथील शिक्षण विभागाच्या शास्त्री भवन येथे लावले असून सर्व राज्यांच्या नवसाक्षर अभियानात आयडॉल म्हणून चित्रकार मोहन जगताप यांच्या चित्राचा देशपातळीवर गौरव होत आहे.

# प्रदूषण नियमांचे पालन न करणाऱ्या बांधकाम विकासकांना महापालिकेच्या नोटिसा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३१, पनवेल :** हिवाळ्यामध्ये एमएमआर भागातील हवेची गुणवत्ता खालवली जात असल्याचे दिसून आले आहे. अशा प्रदूषण करणाऱ्यांवर पनवेल महापालिकेने विशेष लक्ष केंद्रित केले असून प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर पालिकेने ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार आतापर्यंत प्रदूषणास कारणीभूत ठरत असलेल्या सुमारे १६४ बांधकाम विकासकांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. तसेच बेकरी, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट यांना महापालिकेच्या वतीने नोटीसा देणेकामी आदेश पारित करण्यात आले आहेत.

उच्च न्यायालयाने दिलेले निर्देशानूसार निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांची अमंल बजावणी करण्याच्या सूचना विकासकांना देण्यात आल्या असून, वायु गुणवत्ता सुधारण्या साठी संबंधित आस्थापनांनी




१५ दिवसात सुधारणा न केल्यास मुंबई महापालिकेप्रमाणे पनवेल महापालिका क्षेत्रातील बांधकामे थांबविण्यात येणार असल्याच्या कडक सूचना विकासकांना आयुक्तांनी दिल्या आहेत.

हिवाळ्यात वाऱ्याचा कमी वेग आणि कमी तापमान यामुळे नैसर्गिक वायुवीजन कमी होते. त्यासमवेतच थंडीच्या कालावधीत कोरडे वारे आणि ढगाळ हवामान या कारणांमुळे वायु प्रदूषणात वाढ होते. दि.१९ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालयात घेण्यात आलेल्या बैठकीत राज्यातील सर्व महानगर पालिकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये बेकरी व तंदूर करिता पारंपारीक इंधनाऐवजी स्वच्छ इंधन (उदा. एलपीजी/विद्युत) वापरण्यासाठी योजना सादर करण्याचे निर्देश सह संचालक (हवा प्रदुषण नियंत्रण) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी दिले आहेत.

पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये सुरु असलेली बांधकामे व विकासकामांच्या ठिकाणी मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी संबंधित बिल्डर किंवा विकासक यांच्याद्वारे केली जात आहे की नाही याची प्रत्यक्ष पाहणी करुन अहवाल सादर करण्यासाठी महापालिकेमध्ये हवा प्रदूषण नियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. यामध्ये प्रभाग अधिकारी, उप अभियंता, सहाय्यक नगररचनाकार, मुख्य आरोग्य निरीक्षक काम पहाणार आहेत. याच पध्दतीने प्रभाग समिती स्तरीय हवा प्रदूषण नियंत्रण भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत. ही हवा प्रदूषण नियंत्रण समिती भरारी पथकांवरती लक्ष ठेवणार आहे. प्रभाग समिती स्तरावरून प्राप्त होणारे अहवाल व प्रत्यक्ष पाहणी तपासून हवा प्रदूषण नियंत्रणासाठी ही समिती आवश्यक उपाय योजना करणार आहे.

या प्रभाग समिती स्तरीय हवा प्रदूषण नियंत्रण भरारी पथकामध्ये प्रभाग अधिक्षक, पथक प्रमुख, मुख्य आरोग्य निरिक्षक, प्रभाग अभियंता, स्वच्छता निरिक्षक यांची निवड करण्यात आली आहे. या भरारी पथकाच्या माध्यमातून प्रभाग समिती स्तरीय हवा प्रदूषण नियंत्रण पथकाने चालू बांधकाम, विकासकामांना भेट देवून प्रत्यक्ष तपासणी अहवाल पर्यावरण विभागास सादर करावा असे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत. खारघर मध्ये १९; कळंबोली मध्ये २७; कामोठे मध्ये ४४; पनवेल मध्ये ०१; नावडे मध्ये ७३, अशाप्रकारे एकुण १६४ विकासकांना नोटीसा देण्यात आल्या आहेत.

# हिंदू धर्मरक्षक योद्धा पुरस्काराने गोसेवक गिरीश करपे सन्मानित

**अक्षराजः संगीता वनकळस**

**दि.३१, धाराशिव :** धाराशिव येथील गौरीनंदन गोशाळेचे अध्यक्ष गिरीश करपे यांना हिंदू धर्मरक्षक योद्धा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अखिल भारत हिंदू महासभा संत प्रकोष्ठद्वारा हा पुरस्कार करपे यांना प्रदान करण्यात आला. धाराशिव येथे सकल संत सेवा समितीच्या वतीने जगदगुरू संत तुकाराम महाराज वैकुंठ गमन त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संत संमेलनामध्ये सुरू असलेल्या संगीतमय कथा सोहळ्यात हिंदू महासभा राष्ट्रीय अध्यक्ष (आयटी सेल) अजय सिन्हा व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हभप डॉ. ईश्वर गोरोबा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली व आचार्य श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी रामानंद सरस्वती गुंजाळ बाबा यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी मार्गदर्शक गुरुवर्य ह.भ.प. भारत महाराज कोकाटे,गौरीनंदन गोशाळेचे अध्यक्ष गिरीश करपे, उपाध्यक्ष मनोज अंजिरखाने, विश्व हिंदू परिषदेचे धाराशिव जिल्हाध्यक्ष ॲड.गजानन चौगुले, ॲड. प्रवीण अत्रे, प्रा. श्यामराव दहिटणकर, हभप प्रा. दीपक खरात, सुरेश चंद्रकांत करपे व महानंदा सुरेश




करपे, श्रीकृष्ण देशमुख, मेसा जानराव, राजाभाऊ जगताप, राजेंद्र लोहार, ॲड . प्रवीण अत्रे, बंडोपंत कुलकर्णी, दंडवते, बिराजदार, पुष्पाताई शिंदे, प्रा. सोमनाथ लांडगे, सदस्य संकेत सूर्यवंशी, अनंत वाघमारे, शिवलिंग गुळवे, राहुल काकडे, सुजित साळुंके, राज नवले, सलमान शेख, क्षितिज चव्हाण, बंडू देवकते, राज गुरव, मनोज गोरे, श्रीकांत दिवटे, प्रथमेश पेंढारकर, धीरज पतंगे, योगीराज मोरे आदींसह गोसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाडी मुक्ताजी ग्रामपंचायतचा कारभार पारदर्शकच - उपसरपंच देशमुखांची माहिती

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.३१, मुदखेड (नांदेड) :** तालुक्यातील मौजे वाडी मुक्ताजी ग्रामपंचायत गावात समशान भूमी नसता नाही त्या नावावर अनुदान उचललेले यासह विविध विकास कामे फक्त नावालाच दाखवून ग्रामसेवकाने शासनाचा निधी हडप केला आहे पंधराव्या वित्त आयोगातील ५ टक्के निधीही दिव्यांगाना दिला नाही असे विविध आरोप शिवाजी देशमुख यांनी पंचायत समिती मुदखेड चे गटविकास अधिकारी श्रिकांत बळदे यांच्याकडे लेखी तक्रार देऊन एका वर्तमानपत्रांमध्ये बातमी दिली असल्याने त्याच अनुषंगाने गावचे उपसरपंच हनुमंत देशमुख यांनी सदरील माहिती ही अपूर्ण आणि अचूक असून मला व ग्रामपंचायतीला बदनाम करण्याचे षडयंत्र आहे असे माहिती पत्रकार परिषदेत दिली.



मी एक कै.अटल बिहारी वाजपेयी व पंडित दीनदयाल जी उपाध्याय यांच्या विचार चा कार्यकर्ता असून समाजसेवेमध्ये गेल्या पंचवीस वर्षांपासून गावातील ग्रामपंचायत मध्ये कधी सरपंच तर कधी उपसरपंच या माध्यमांतून मी गावची सेवा केलेली आहे. आणि माझा संपूर्ण ग्रामपंचायतचा कारभार पारदर्शक असून दिव्यांग बांधवांना दिलेले जीएसटीचे बिलासह माझ्याकडे देयके आहेत.

समशानभूमीच्या नावावर अद्यापही माझ्या ग्राम पंचायतीला निधी आलेला नसून ही अत्यंत चुकीची आणि अपूर्ण माहिती आहे असं मी आपल्या सर्व पत्रकार बांधवांना या ठिकाणी सांगू इच्छितो आणि गावच्या विकासासाठी मी सदैव संपूर्ण सदस्यांना व ग्रामसेवक यांना विश्वासात घेऊन एकत्र ठरवानुसार गावचा विकास केलेला आहे.

कोणी जर विकास करत असताना आणि विकास कामात अडथळा आणण्याचे हे गैरवर्तन गैरसमज असल्याचे मी या ठिकाणी आपणास सांगू इच्छितो, लोकांनी लोकशाही मार्गाने आम्हाला निवडून दिले असून लोकसेवक म्हणून आम्ही कामे करत आहोत अजून सुद्धा गावाला स्मशानभूमी नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.

# अक्षराज दिनदर्शिका २०२५ चे उप प्रादेशिक कार्यालय वाशी येथे वाटप



**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.३१, ठाणे (नवी मुंबई) :** नेरूळ येथे उप प्रादेशिक कार्यालय वाशी, नवी मुंबई या ठिकाणी 'दैनिक अक्षराज दिनदर्शिका २०२५' चे वाटप सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाच्या आगमनाची आरटीओ विभागाची तयारी चालू असताना दैनिक अक्षराज च्या टीम तर्फे दैनिक अक्षराज चे नेरूळ विभाग प्रतिनिधी गणेश जाधव (धर्मवीर रिक्षा चालक सेना, सीबीडी विभाग अध्यक्ष) व आरटीओ प्रतिनिधी तसेच धर्मवीर रिक्षाचालक सेनेचे युवराज पाटील सह महादेव चव्हाण दैनिक अक्षराज ठाणे जिल्हा विशेष प्रतिनिधी यांनी अक्षराज दिनदर्शिका २०२५ चे वाटप उपप्रादेशिकाचे मुख्य अधिकारी उपाधिकारी आणि संपूर्ण कर्मचारी वर्ग, सर्वांना दिनदर्शिकेचे वाटप केले.

त्यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन गावंडे, आरटीओ इन्स्पेक्टर प्रशांत शिंदे, म्हेत्रे, पवार,



जाधव, चव्हाण, एआयएमव्ही कुणाल मोहीते, खरात, मनोज घोरपडे, जाधव, जगतात, परिवहन कार्यालय स्टाफ, देवकर साहेब, जाधव, कानगुडे, शिर्के, काणे, लोहार, रवी निचिते, इत्यादींना अक्षराज दिनदर्शिका वाटप करण्यात आले.

# तब्बल २७ वर्षांनी भरली माजी विद्यार्थ्यांची शाळा; विद्यार्थ्यांचा मेळावा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील कर्जुले हर्या येथिल हरेश्वर माध्यमिक विद्यालय सन १९९७ च्या इयत्ता दहावीला शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ढवळपुरी येथील अंकुर व्हॅली या ठिकाणी मैत्रीपूर्ण स्नेह मेळावा आयोजित करत १९९१ ला वेगवेगळ्या वाटांनी गेलेले व वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत असलेले वर्गमित्र पुन्हा २७ वर्षांनी एकत्र आले होते. यावेळी लहानपणीच्या शाळेतील आठवणींना उजळा देत अतिशय आनंदीमय वातावरणात हा स्नेह मेळावा पार पडला. यातील काही उच्च पदस्थ म्हणून पुणे, मुंबई या ठिकाणी कार्यरत आहेत तर काहींनी देशाची सेवा करत मिलिटरी रिटायर आहेत तर काही व्यवसाय




व शेती करतात. यावेळी सर्व माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. पण या सत्तावीस वर्षाच्या काळामध्ये ५ जणांचा वेगवेगळ्या कारणाने मृत्यू झाला. त्यांचीही आठवण काढत त्यांना सर्वानुमते श्रद्धांजली वाहण्यात आली. यातील काही जणांची घरची परिस्थिती हलाखीची असल्याकारणाने सर्वांनी मनोगत व्यक्त करताना एक सामाजिक बांधिलकी म्हणून त्यांना मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही शाळा परत भरवण्यासाठी गोपाळा दातीर व विलास कोकाटे यांनी मेहनत घेतली. यावेळी संतोष वाडेकर, प्रमोद चिंतामणी, विलास कोकाटे, गोपाळ दातीर, यदुनाथ वाफारे, बापू दातीर, हिराबाई दाते,योगिता उंडे, ललिता शिंदे,अर्जुन वाफारे,संदीप मुळे, संतोष खैरे, राजेंद्र माने, संदीप उंडे, अर्जुन वाफारे, संतोष गोडसे, शंकर कासुटे,दत्ता ठोकळ, प्रतिभा आंधळे, कविता कोकाटे,नारायण शिंदे,छाया माने,वंदना उंडे, निशा आंधळे, नारायण जडगुले, सुनीता काळे, बाबाजी गायखे, वसंत गायखे नवनाथ गांजे, नंदा हुलावळे, अनुसया गोडसे, विकास दाते, मल्हारी उंडे बाळासाहेब उंडे, भिमराज मुळे, संतोष आंधळे, गंगाराम घुले यांच्या सह विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्रामध्ये जागतिक कीर्तीची महामुंबई मार्केट कमिटी बनविणार - पणन मंत्री रावल

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३१, वाशी (नवी मुंबई)** : महाराष्ट्र कायम अग्रगण्य राहिलेला आहे. १९७७ ला नवी मुंबई मार्केट कमिटी बनविण्यात आली. त्यावेळी ती भारतातली आणि आशिया खंडातील सर्वात मोठी मार्केट कमिटी होती. काळाच्या ओघात अनेक नवीन मार्केट कमिट्या निर्माण झाल्या. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीची सध्याची जागा आता कमी पडत आहे. मात्र ही बाजार समिती कार्यान्वित राहणार असून काळाच्या गरजेनुसार आणखी बाजार समित्या कार्यान्वित केल्या जातील. ही बाजार समिती भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वोत्कृष्ट बाजार समिती असेल हेच आमचे ध्येय आहे. महाराष्ट्र कायम नंबर वन राहिला आहे. जगातील पहिल्या तीन सर्वात मोठ्या मार्केट कमिट्यांचा अभ्यास करून महाराष्ट्रामध्ये तितकीच तुल्यबळ एक नवीन महामुंबई मार्केट कमिटी बनविणार, जी जगामध्ये महाराष्ट्र राज्याचे नाव मोठे करेल, असा संकल्प या खात्याचा मंत्री या नात्याने मी केला आहे. या बाजार समितीच्या माध्यमातून सर्वांनी एकत्र येवून आदर्श काम उभे करू या. यासाठी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने मार्गी लावले जातील, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी आज येथे केले.



राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशी येथे आढावा बैठक संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी माजी मंत्री तथा मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शशिकांत शिंदे, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक, उपसभापती धनंजय वाडकर, सचिव डॉ.पांडूरंग खंडागळे व सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

मंत्री रावल पुढे म्हणाले की, सध्याच्या परिस्थितीत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे पुनर्विकासाचे काम प्रस्तावित आहे. याचे नियोजन करताना पुढील ५० वर्षांचे नियोजन करावे. हे काम टप्प्याटप्प्याने वेगाने पूर्ण केले जाईल. पुढील ४५ दिवसात या कृषी उत्पन्न बाजार समिती विषयीच्या विविध प्रश्नांबाबत ठोस निर्णय घेण्यात येतील. राज्य व केंद्र शासनाची मदत घेवून आशियातील सर्वात मोठी मार्केट कमिटी आहे. या लौकिकाला साजेसे काम करूया. जगातील इतर आघाडीच्या मार्केट कमिट्यांचा अभ्यास करावा. लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बैठकीसाठी वेळ मागितला जाईल व मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रलंबित विषयांबाबत सविस्तर चर्चा व उपाययोजनांसंबंधीचे नियोजन करण्यात येईल. येत्या काळात सद्य:स्थितीत असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अख्यत्यारीतील बाजारपेठांचे विभागनिहाय कृषी मेळावे घेणे प्रस्तावित आहे.

ते पुढे म्हणाले की, सर्व घटकांना एकत्र घेवून या कृषी उत्पन्न बाजार समितीचा विकास साधला जाईल. शेतकऱ्यांसाठी आणि व्यापाऱ्यांसाठी सकारात्मक निर्णय घेतले जातील. शेतकऱ्यांच्या हितासाठी राजशिष्टाचार आणि पणन विभागाचा मंत्री या नात्याने या दोन्ही विभागांची सांगड घालून शेतकऱ्यांसाठी काही उपयुक्त निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल. लोकांसमोर आपल्याला आदर्श काम ठेवावेच लागेल. शेतकरी आणि व्यापाऱ्यांसाठी आवश्यक त्या सोयीसुविधा उभारल्या जातील.

या बैठकीनंतर पणन मंत्री श्री.रावल यांनी प्रसार माध्यमांशीही संवाद साधला. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचा परिसर आणि कृषी व पणन मंडळाच्या निर्यात सुविधा प्रकल्पांची पाहणी केली.

बैठकीच्या सुरुवातीस पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्यासमोर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव डॉ.पांडूरंग खंडागळे आणि मुख्य वित्त व लेखा अधिकारी मंदार साळवी यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे कामकाज तसेच प्रस्तावित बाबींची माहिती सादर केली. माजी मंत्री तथा मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शशिकांत शिंदे यांनी बैठकीच्या प्रास्ताविकात मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत मंत्री महोदयांचे लक्ष वेधले. या बैठकीच्या निमित्ताने संचालक मंडळातील काही संचालकांनी बाजार समितीचा पुनर्विकास, सध्याची कार्यपद्धती, भविष्यातील सुधारणा, अपेक्षित सोयीसुविधा याविषयी आपली मते मांडली. शेवटी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी मंत्री महोदयांचे व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

# ग्रंथ पूजनाने ठाणे ग्रंथोत्सव २०२४ चे उद्घाटन संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३१, कोपरखैरणे (ठाणे)** : महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे ग्रंथोत्सव २०२४ चे आयोजन कोपरखैरणे येथील ज्ञान विकास संस्था येथे करण्यात आले आहे. या भव्य ग्रंथोत्सवाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते ग्रंथपूजन करून आज करण्यात आले. यावेळी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, ज्ञान विकास संस्थापक अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड पी.सी. पाटील, प्रा.माणिकराव कीर्तन वाचनालय वाशीचे सुभाष कुळकर्णी, ज्ञान विकास संस्थेचे उपाध्यक्ष राम पाटील, जेष्ठ संचालक अशोक पाटील, सोन कांबळे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे माजी संचालक देवेंद्र भुजबळ, जेष्ठ कवी अरुण म्हात्रे, ठाणे जिल्हा ग्रंथाचे अध्यक्ष चांगदेव काळे, आदी मान्यवर उपस्थित होते.



ज्ञान विकास संस्थेचे प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक, डीव्हीएस इंग्रजी प्राथमिक माध्यमिक, डीएस महाविद्यालय, डीव्हीएस कॉलेज ऑफ कॉमर्स अँड. पीसी पाटील विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी या ग्रंथोत्सव दिंडी मध्ये सहभागी झाले होते. तसेच या ग्रंथोत्सव दिंडी नवी मुंबई महानगरपालिका परिमंडळ - २ उप आयुक्त कैलास गायकवाड, प्रा.माणिकराव कीर्तन वाचनालय, वाशीचे सुभाष कुलकर्णी, ज्ञान विकास संस्था कोपरखैरणेचे संस्थापक - अध्यक्ष पी.सी. पाटील, ठाणे जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील तसेच शाळा कॉलेजचे प्राचार्य व शिक्षक सहभागी झाले होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ज्ञान विकास संस्थापक अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड पी.सी. पाटील म्हणाले की, शासनाच्या सर्व कार्यक्रमांना आमच्या विद्यालयाकडून प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न करतो. आमच्या विद्यालयातील सर्व विद्यार्थी कमीत कमी एक पुस्तक खरेदी करतील. वाचन चळवळ वाढविण्यासाठी हे आवश्यक आहे. ग्रंथ समाजाला दिशा देण्याचे काम करतात. स्वतःला अद्यावत ठेवणे, स्पर्धेत टिकून रहाणे यासाठी वाचनाला पर्याय नाही. वाचनामुळे विचारात प्रगल्भता येते. नवे विचार मांडून समाजाला दिशा देणे हे ग्रंथाचे काम आहे. शासनाचे उपक्रम राबविण्यासाठी हे विद्यालय नेहमी सहकार्य करेल. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर म्हणाले की, या ग्रंथोत्सवमधून आपल्या ज्ञानाचे खाद्य आपल्याला मिळणार आहे. आपण खूप भाग्यवान आहात इतका मोठा कार्यक्रम आपल्या शहरात होत आहे.

या कार्यक्रमासाठी आपल्या पालकांना सुध्दा घेवून या. आपल्या आवडणाऱ्या लेखकाचे एकतरी पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याने वाचायला पाहिजे. ही पुस्तक आपण व पालकांनी तसेच शिक्षकांनी खरेदी करावी. वाचनाची आवड वाढली पाहिजे, यासाठी शासनाने आता वाचन प्रकल्प हाती घेतला आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे पुस्तक एक तास वाचले पाहिजे. तुम्ही काय वाचले आहे, याचे परीक्षण आपल्या हाताने लिहायचे आहे. ते परीक्षण आपल्या महाविद्यालयामध्ये जमा करायचे आहे. ही संकलित माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात येणार आहे. शासन यातून चांगले वाचक विद्यार्थ्यांना पारितोषिक देणार आहे. १ ते १५ जानेवारी मध्ये या वाचन साप्ताह राबविण्यात येत आहे, यामध्ये आपण सहभागी व्हावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील व सूत्रसंचालन संतोष जाधव तर आभार प्रदर्शन प्रतिभा पाटील यांनी केले.

# मुंबई स्थित व महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या पुष्पक को-ऑप क्रेडिट सोसायटीचा वर्धापनदिन साजरा

**अक्षराज : महादेव चव्हाण.**

**दि.३१, मुंबई (कांजूरमार्ग)** : मुंबई कांजूरमार्ग येथे दिनाक ३१ डिसेंबर १९९८ रोजी पुष्पक को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि. ची कांजूरमार्ग, मुंबई. येथे स्थापना झाली. आज संस्थेला २६ वर्ष पुर्ण झालेलीअसून आज अखेर संस्थेच्या मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, सातारा या जिल्हयाच्या ठिकाणी संस्थेच्या १८ शाखा कार्यरत आहेत.

संस्थेचा ३७० कोटी रुपये संमिश्र व्यवसाय असुन समाजातील आर्थिक वंचित घटकांना साह्य करून व सामाजिक उपक्रम राबवून सभासदांची आर्थिक परिस्थिती चांगली केली आहे. आज संस्थेच्या सर्व शाखामधून वर्धापनदिन दिन साजरा केला.



त्यामध्ये संस्थेचे सभासद, हितचिंतक, राजकीय, सामाजिक व सहकार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्तिंनी संस्थेस भेट देऊन संस्थेच्या कामाबद्दल आनंद व्यक्त केला व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेची स्थापना संस्थेचे मार्गदर्शक व्ही.जी.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे विद्यमान अध्यक्ष जी.ए.पवार, उपाध्यक्ष अर्जुन भोसले, माजी अध्यक्ष परशुराम फडतरे, संचालक मंडळ, व्यवस्थापक किरण पवार यांनी अतिशय खडतर परिस्थितीत सुरवात करून एका लहान रोपाचे रोपण करून अविरत कष्ट करून जपले आज त्याचा वटवृक्ष झाला आहे.

सहकार क्षेत्रात आजपर्यंत खुप अडथळे आले मात्र २०२० जागतिक स्तरावर करोना सारख्या आजाराने जिवीत व आर्थिकहानी निर्माण झाली. त्यामध्ये आर्थिक क्षेत्रातील बऱ्याच संस्था व बँका अडचणीत आल्या.

सद्यस्थितीत राजकीय, महागाई, अस्थिर आर्थिक परिस्थितीत देखील संस्थेने आपले कार्य व सेवा सभासदांना दिल्या. सहकार क्षेत्रात पुष्पक संस्थेने नाविन्यपूर्ण काम केले आहे. संस्था ही आर्थिक संस्था न रहाता आज परिवार झाला आहे. आज सर्व सभासद व प्रतिष्ठित व्यक्ती यांनी संस्थेस भेट देऊन संस्थेचा गौरव केला त्याबद्दल संस्था त्यांची आभार मानले. व बऱ्याच सभासदांना या वेळी कामामुळे उपस्थित राहता आले नाही. संस्था चालू वर्षांमध्ये सभासदांसाठी सामजिक, सांस्कृतिक कार्यक्रम राबविणार आहे. तसेच सभासदांनी सभासद रक्कमेमध्ये वाढ करावी व संस्थेस या तारुण्यावस्थेत जोमाने काम करण्यासाठी पाठबळ द्यावे. कर्जाचे नियमितपणे हप्ते भरावेत. असे अध्यक्षीय भाषणात त्यांनी मनोगत व्यक्त केले व पुन्हा एकदा सर्वांचे आभार व्यक्त केले.

## थोडक्यात

# आरटीओच्या ई प्रणाली नियमाच्या धोरणामुळे रुग्णवाहिका सेवा अडचणीत

**अक्षराज : गणेश जाधव**




**दि.३१, नेरूळ (नवी मुंबई)** : रुग्णवाहिका ही अत्य आवश्यक सेवेमध्ये मोडत असून त्याच्यावर वेग मर्यादा नियंत्रण आणले आहे. आरटीओच्या ई प्रणाली नियमामुळे रुग्णवाहिकाच्या वेगाला ला लगाम लागणार आहे. या लगामामुळे रुग्णाचा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी रुग्णांना नेताना रुग्ण सिरीयस कंडिशन होण्याचे किंवा मृत्यूचे प्रमाण वाढणार आहे. या घडणाऱ्या दुर्घटनेला आरटीओ प्रशासन जबाबदार राहील. त्याची नोंद प्रशासनाने घ्यावी. कारण पेशंट एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना रुग्णवाहिका वेग इ चलन दंड आकारत आहे. आरटीओ प्रशासनाने रुग्णवाहिकेसाठी लागणारे इ. चलन दंड बंद करण्यासाठी गांभीर्याने विचार करावे. अशी मागणी महाशक्ती ॲम्ब्युलन्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य संघटनेने केली आहे. रुग्णवाहिकेला वेग मर्यादा लावल्याने रुग्ण हॉस्पिटला पोहोचायला उशीर होईल. त्यामुळे रुग्णाचा जीव धोक्यात येऊ शकतो. रुग्ण दगडू शकतो. त्यामुळे आम्ही रुग्णाच्या जीवाशी खेळू शकत नाही. आम्ही रुग्णांचा जीव वाचवण्यासाठी आमची जीवाची बाजी पणाला लावत असतो. वेग मर्यादेचे रुग्णवाहिकेला दंडआकरण्याच्या नियमाचा निषेध करतो. प्रशासनाने गांभीर्य लक्षात घेऊन जर निर्णय बदलला नाही तर भारतभर रुग्णवाहिकेचे चालक मालक रस्त्यावर उतरून रुग्ण सेवा भारतभर बंद करतील. याची दखल शासनाने व आरटीओ प्रशासनाने घ्यावी.

# कळंब येथे दैनिक अक्षराज दिनदर्शिकेचे मोठ्या उत्साहात प्रकाशन




**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.३१, कळंब (धाराशिव)** : कमी कालावधीत महाराष्ट्रभर प्रसिद्ध होत असलेल्या दैनिक अक्षराज मीडिया या दिनदर्शिकाचे प्रत्येक वर्षी प्रमाणे या ही वर्षी कळंब येथे दैनिक अक्षराज परिवाराच्या वतीने मोठ्या उत्साहात प्रकाशन करण्यात आले. यावेळी दै.सकाळ कळंब तालुका प्रतिनिधी राजेश सावंत, दैनिक अक्षराजच्या धाराशिव जिल्हा प्रतिनिधी संगीता वनकळस, कळंब तालुका प्रतिनिधी राजेश पुरी, कळंब तालुका प्रतिनिधी व विश्वमत न्युज संपादक अशुबा कोठावळे, कळंब तालुका प्रतिनिधी व मन मराठी न्यूजचे संपादक अशोक कुलकर्णी, बाळासाहेब नलवडे व्यापारी, काकासाहेब मांडवे व्यापारी, दत्तात्रय ठोंबरे व्यापारी, अभय वार्ताचे संपादक जयनारायण दरक, पत्रकार संभाजी पांचाळ या सर्वांच्या हस्ते दैनिक अक्षराज दिनदर्शिकाचे प्रकाशन करण्यात आले. दैनिक अक्षराजच्या परिवारातर्फे सर्व वाचकांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

# ढोकेश्वर विद्यालयाच्या पर्यवेक्षक पदी बाळासाहेब खिलारी यांची निवड

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.३१, पारनेर (अहिल्यानगर)** : तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील बाळासाहेब नारायण खिलारी यांची शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असलेल्या अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाचे. श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर या विद्यालयात पर्यवेक्षक पदी नेमणूक करण्यात आली असून, सध्या ते संस्थेच्या श्री. गोरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोरेगाव येथील विद्यालयात कार्यरत होते. त्यांची संस्थेतील एकूण सेवा २७ वर्षे झाली असून यापूर्वी त्यांनी न्यू इंग्लिश स्कूल पारनेर व श्री ढोकेश्वर विद्यालयात हिंदी विषयाचे अध्यापन केले आहे. खिलारी सरांची पर्यवेक्षक पदी श्री ढोकेश्वर विद्यालयात नेमणूक झाल्याबद्दल, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त आदरणीय सिताराम खिलारी, मॅनेजमेंट सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, विद्यालयाचे प्राचार्य सुनील वाव्हळ गावातील सर्व ग्रामस्थ व पालक यांनी अभिनंदन केले आहे.

# अहिल्यानगरमध्ये जिल्हास्तरीय ब्युटी टॅलेंट शोचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर** : सावेडी, गुलमोहर रोड येथील कोहिनूर मंगल कार्यालयात दिनांक १० जानेवारी रोजी ब्युटी टॅलेंट शोचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय मेकअप आर्टिस्ट अलका गोविंद ब्युटी पार्लर प्रशिक्षणाबाबत महिला व युवतींना मोफत मार्गदर्शन करणार असल्याची माहिती मेकअप आर्टिस्ट कावेरी कैदके, विद्या सोनवणे, आरती शिंदे व जयश्री शिंदे यांनी दिली. नेहरु युवा केंद्र, जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या माध्यमातून राष्ट्रीय युवा सप्ताहाचे औचित्य साधून जिल्हास्तरीय ब्युटी टॅलेंट शोचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १ वाजता या कार्यशाळेला प्रारंभ होणार आहे. दिवसेंदिवस अत्याधुनिक पद्धतीचे शास्त्रोक्त पद्धतीने मेकअप करण्याची कला बाजारात प्रचलित होत आहेत. सौंदर्याबाबत महिला देखील जागृत झाल्या असून, सौंदर्य खुलवण्यासाठी विविध प्रकारे काळजी घेतली जात असताना महिला व युवतींना याचे अद्यावत ज्ञान दिले जाणार आहे. बाजारात नव्याने आलेले सौंदर्य प्रसाधने, त्वचेला हानी न पोहोचविता करता येणारी उपाययोजना व सुंदरता वाढविणे आदी विविध तंत्रज्ञानाची माहिती देखील या सेमिनार मधून मिळणार आहे. ब्युटी क्षेत्रात चांगले करिअर करण्याची व महिलांना स्वयंरोजगारीची संधी निर्माण करून देण्याच्या उद्देशाने सेमिनार व ब्युटी टॅलेंट शोचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सहभागासाठी होण्यासाठी ९९२१७१२३१२ व ९६५७५११८६९ यावर संपर्क साधून नाव नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले. यामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व ब्युटीशियन महिलांना प्रमाणपत्र दिले जाणार आहेत.